स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड या विद्यापीठाच्या
अंतर्गत सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील 'इतिहास' विषयातील पीएच.डी. पदवी
मिळवीण्यासाठी सादर करावयाचा संशोधन अराखडा

❊ शिर्षक ❊

महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये मराठा सेवा संघाचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास

❊ संशोधक ❊

शिवाजी भगवानराव ताटे

एम.ए., बि.एड्., सेट

मो. 9763181808

ई-मेल :-shivaji9763@gmail.com

❊ मार्गदर्शक ❊

डॉ.डी.डी.कोल्हेकर

(एम.ए.,पीएच.डी.)

संशोधन मार्गदर्शक व इतिहास विभाग प्रमुख,

कै.बाबासाहेब देशमुख गोरठेकर

कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, उमरी

ता.उमरी, जि.नांदेड.-४३१८०७

(महाराष्ट्र)

मो.: 9923359517

ई-मेल :-dattakolhekar@gmail.com

❊ संशोधन केंद्र ❊

हुतात्मा गोविंदराव पानसरे महाविद्यालय, अर्जापूर

महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये मराठा सेवा संघाचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास

* प्रस्तावना *

आपल्या भारत देशाला संत, शुरविर आणि महापुरुषांचा फ़ार मोठा वारसा लाभलेला आहे. पुरातन काळातील आदय गणनायक, शंकर पार्वती, चार्वाक, सम्राट बळीराजा, वर्धमान महावीर, गौतम बुध्द यांच्या विचारांचा वारसा सर्वांनी जपला आहे. त्यामध्ये अलीकडच्या काळातील संत नामदेव, संत गोरोबा काका, संत चोखामेळा, संत रविदास, संत तुकाराम महाराज, गुरु नानक यांच्या सारख्या चिंतनशिल विचारांनी ही भारतभुमी सुपिक केली. संतांच्या प्रेरणादायी विचारातूनच देशावर होणाऱ्या बाह्य आक्रमनांचा मुकाबला करणारे शुरवीर, राष्ट्रपुरुष जन्माला आले. आपल्या देशातील शुरवीरांच्या कथामधुन प्रेरणा घेवून अनेक देशांनी स्वातंत्र्य मिळवीले आहे. शिवरायांचा दैदिप्यमान इतिहास जगातील अनेक विद्यापीठात अभ्यासला जात आहे. जिजाऊ माॅ साहेब, छत्रपती शिवराय, महात्मा ज्योतीबा फुले, छत्रपती शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महानरत्ने जगाने स्विकारली आणि प्रगती करुन घेतली. पण आपल्या देशाने म्हणावा तसा उपयोग करुन घेतला नाही. त्यामुळेच आपण अनेक पारतंत्र्यात जाताना दिसतो आहे.

खर तर समाजात चैतन्य निर्माण करणाऱ्या या महान विभुतींचा शालेय जिवनात वारंवार सबंध यायला हवा तरच आपल्यातील माणुस सतर्क जागृत राहील. अन्याय सहन करणार नाही किंवा इतरांवरही अन्याय करणार नाही. पण तसे न झाल्याने आपण आपला इतिहास विसरत आहोत. तो सांगण्यासाठी पुन्हा कोणीतरी आपले आयुष्य खर्ची घालावे लागेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "ज्या समाजाला आपला इतिहास माहित नसतो, तो समाज इतिहास घडवू शकत नाही" त्यामुळे शत्रु आपल्याच इतिहासाचे भांडवल करुन गुलाम बनवतो. शिवरायांच्या कार्याचा वारसा राष्ट्रपिता ज्योतीराव फुले यांनी चालवला. शिव–फुले–शाहु–आंबेडकर यांच्या नेतृत्वाने सामाजिक सुधारणांना एक प्रकारची संजिवनी मिळाली. समाज सुधारणेचे वारे केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतामध्ये वाहू लागले. सामाजिक क्षेत्रामध्ये अनेक प्रकारच्या संघटना कार्य करु लागल्या त्यामध्ये मराठा सेवा संघाचे महत्वपुर्ण स्थान आहे.

मराठा सेवा संघाची स्थापना १ सप्टेंबर १९९० रोजी अकोला महाराष्ट्र येथे आदरणीय पुरुषोत्तमजी खेडेकर यांनी केली. आज ही संघटना राहिलेली नाही तर एक सामाजिक परिवर्तनाचा लोक लढा असे स्वरुप आलेले आहे. देशभर व देशाबाहेरील एक वैचारिक ओळख पोहचविण्यात मराठा सेवा संघाला चांगले यश आले आहे. सामाजिक परीवर्तनातून राष्ट्र विकास होत असतो. व्यक्तीची वा कूटूंबाची प्रगती ही त्या समाजाची प्रगती पर्यायाने देशाचीही प्रगती असते. म्हणून पुरुषोत्तम खेडेकर यांनी समाजाला ३० वर्षापुर्वीच बुटाच्या पॉलीश पासुन डोक्याच्या तेल मालीश पर्यंत आपल्या कौशल्यानूसार व्यवसाय करावा हा

संदेश दिला आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीने स्वत:चे मन, मनगट, मनका, मान, मस्तक, मेंदू सशक्त करण्यावर भर दिलाच पाहीजे. वैज्ञानिक विचारसरणीच्या दृष्टीकोनाचा अवलंब करुन स्वत:चे, कूटूंबाचे व समाजाचे सर्वांगीन हित जोपासण्यावरच भर दिला पाहीजे. मातृत्व, भातृत्व, बंधूत्व, पितृत्व, दातृत्व, कृर्तत्व, वक्तृत्व,नेतृत्व, वृध्दीगंध करण्यावरच प्रत्येकाने लक्ष केंद्रीत करावे असा संदेश दिला आहे. एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीचा आधार व्हावा एकमेकांना मदत करावी. आपली वाणी, नाणी, लेखणी एकमेकाविरुध्द वापरु नये. वाचन, चिंतन, मनन व कृतीशिलतेवर भर दिलाच पाहीजे. आपापसातले मतभेद गाढून टाकून एकसंघ, एकजिव समाज निर्माण करणे. समाजासाठी कार्य करणारे पूर्ण वेळ कार्यकर्ते निर्माण व्हावे आशा कार्यकर्त्यांची संपूर्ण जबाबदारी समाजाने उचलावी. समाज कार्यकर्त्यास मानाचे स्थान असावे. समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या मनामध्ये सामाजिक परिर्वतनाच्या दिशेने सकारात्मक विचारसरणी जोपासली जावी. समाजाच्या सर्वांगीन उन्नतीसाठी प्रत्येकाच्या मनात जबरदस्त इच्छा शक्ती, जिद्द, प्रयत्न व सातत्य असावे. ‘‘समाजाने मला काय दिले’’ या पेक्षा ‘‘समाजासाठी मी काय देवू शकतो’’ हीच भावना प्रत्येकाने मनात जोपासली पाहीजे. व्यक्तीपेक्षा समाज मोठा असतो हेच प्रत्येकाच्या मनावर बिंबवले गेले पाहीजे. हे शिक्षण मराठा सेवा संघाने दिले.

शिक्षणसत्ता, धर्मसत्ता, राजसत्ता, अर्थसत्ता व प्रचार–प्रसार माध्यमसत्ता ह्या पाच मराठा सेवा संघाच्या पंचसूत्री आहेत. ही प्राप्त करण्यासाठी श्रम,वेळ,बुध्दी,कौशल्य व पैसा हे पंचदान समाजाकडून मागितले आहे. मराठा या समाजाबद्दल अनेक चुकीच्या समजुती मराठा समाजातच आहेत. तशा बाहेरही आहेत, मराठा अस्मिता ही पोषणाची, निर्मिती व सृजनाची अस्मिता आहे. मराठयांच्या विविध पोटजाती व पोटभेद संपवने, जनमनातील मराठा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तत्सम जनसमूदाय एकत्र करुन त्यांना एकसूत्रात बांधणे ही महत्वाची कामगिरी मराठा सेवा संघाची आहे.

मराठा सेवा संघ प्रणित ३२ कक्षात कामाची विभागणी करुन आवडीनूसार त्या त्या क्षेत्रात कार्य करण्याची मूभा समाजबांधवांना दिलेली आहे. समाजाच्या नावाने जरी ही संघटना असली तरी ही संघटना सर्व समाज घटकांना एकत्र आणणारी संघटना आहे. भारतातील परंपरागत सामाजिक व्यवस्थेविरुध्द बंड करणारी ही संघटना आहे. महाराष्ट्रातील जातीय दंग्याचे उच्चाटन करणारी ही संघटना आहे.

* मराठा सेवा संघाची पंचसुत्री *

१) शिक्षणसत्ता :-

शिक्षणाचे महत्व साऱ्या जगाने ओळखले पण मराठा अजुन जागृत नाही. २१ व्या शतकाच्या उंबरठयावर जगातील सर्वात जास्त निरक्षर माणस आपल्या देशात आहेत. महात्मा फुलेंनी म्हटले आहे की,

‘‘विद्येविना मती गेली, मतीविना निती गेली,
निती विना गती गेली, गती विना वित्त गेले,
वित्त विना शुद्र खचले, एवढे सारे अनर्थ
एका अविद्येने केले’’

एवढे शिक्षणाचे महत्व सांगून देखील समाजामध्ये व्हावी तेवढी प्रगती झाली नाही. शिवाय शिक्षणाचा एकमेव सबंध नोकरीसी जोडल्यामुळे समाजातील शिक्षित तरुण बेकार होऊन चुकीच्या मार्गाने जावू लागले. शिक्षित व्यक्तीला स्वत:च्या व समाजाच्या उन्नतीसाठी आवश्यक असणाऱ्या बाबींचा कृतीशील अवलंब करता आला पाहीजे. त्याला चांगला वाईटचा फ़रक समजावा. 'शिक्षण' ही प्रगतीसाठी पहिली पायरी आहे. शिक्षण शिकणे म्हणजे विविध भाषेवर प्रभुत्व मिळविने, परदेश फ़िरणे, अंधश्रध्दा जाळणे, समता स्थापणे, उच्च विद्या विभुषित होणे, हे मराठा सेवा संघाला अभिप्रेत आहे.

२) अर्थसत्ता :-

भारतदेशामध्ये शेती हाच मुख्य व्यवसाय असल्यामुळे निसर्गाच्या लहरीवर त्यांचे अर्थकारण आहे. या देशातील मातीचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्याला मातीतून सोने मिळते पण देशाचा अन्नदाता शेतकरी स्वत:च्या सोन्यासारख्या धनधान्याच्या भाव मातीपेक्षाही कमी घेतो. त्याच्या शेतीमालाचा भाव ठरविण्याचा अधिकार त्याला नाही. मराठा समाज आर्थिकदृष्टया पुर्णपरावलंबी आहे. अर्थाशिवाय कशातही अर्थ नाही. त्यामुळे मराठा समाजाने व्यवहारीक व्हावे. आपल्या शेतात काय पिकते त्या पेक्षा बाजारात काय विकते हे महत्वाचे आहे. येणारी आव्हाणे संकट म्हणून न बघता संधी म्हणून बघावे शेतीवरती अवलंबून राहु नये. शेती कालबाह्य ठरत आहे. सेवा उद्योग वाढत आहे. म्हणून बुटपॉलीश पासुन ते डोक्याच्या तेलमॉलीश पर्यंत कोणताही उद्योग करावा.

३) धर्मसत्ता :-

मराठा सेवा संघाने शिवधर्माची स्थापना केली. मराठा सेवा संघाच्या मतानुसार सिंधू संस्कृती म्हणजेच 'शिवसंस्कृती' होय. हाच धर्म 'शिवधर्म' होय. ज्या धर्मातील सुत्रे आपल्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतीक, आर्थिक, मानसीक, बौध्दीक, वैज्ञानिक प्रगतीच्या आढ येतात त्या धर्माशी आपले नाते काय? ते शोधले पाहीजे. त्या धर्माशी नाते तोडले पाहीजे. व आपल्या मुळच्या सिंधू संस्कृतीतील शिवधर्म स्विकारला पाहीजे. जगतगुरु तुकाराम महाराज या संतांने शब्दाचे भांडार आम्हाला दिले. पण आम्ही मात्र धर्म म्हणजे अंधश्रध्दा एवढाच अर्थ लावला आहे.

४) राजसत्ता :-

राजसत्ता म्हणजे देशाचे कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ व न्याय मंडळ म्हणजेच संसद, सचिवालय व सर्वोच्च न्यायालय होय. देशाच्या कायदे मंडळात म्हणजे लोकसभेत वा राज्याच्या विधानसभेत मराठा समाजाचे, शेतकऱ्यांचे प्रश्न मांडणारे खासदार, आमदार बोटावर मोजण्या एवढे देखील नाहीत. मराठा समाजातील, शेतकरी पुत्र आमदार, खासदार होतात पण ते कमी शिकलेले, नेत्रत्वहीन, लाचार, सदावाकणारे, पक्षासी बांधील आसतात त्या मुळे ते शेतकऱ्यांचे किंवा समाजाचे प्रश्न मांडत नाहीत. मराठा सेवा संघाच्या मतानूसार शेतकऱ्यांचे प्रश्न मांडणारे, बुध्दीवान, कर्तत्ववान, शेतकऱ्याबद्दल आस्था असणारे, प्रखड वकृत्व असणाऱ्या तरुण मुलांनी राजसत्ता हातात घेतली पाहीजे.

५) प्रचार-प्रसार माध्यमसत्ता :-

क्रमीक पुस्तके, व्याख्याने, चर्चासत्रे, किर्तन, पोथ्यांचे वाचन विविध लिखीत–मौखिक साहित्य, वर्तमानपत्रे, दुरदर्शन इत्यादी प्रचार–प्रसारमाध्यमांची साधने आहेत. भाषेच्या माध्यमातुन मानसशास्त्रीय तत्वांचा आधार घेवून प्रचार–प्रसार माध्यमसत्ताचा गैरवापर करुन राईचा पर्वत

केला जावू शकतो वा पर्वताची राई केली जावू शकते. एखादी गोष्ट जर १०० वेळा पून: पून: सांगितली तर ऐकनाऱ्यांना ती खरी वाटू लागते. सर्व सामान्यपणे ९०% पेक्षा ही जास्त लोक ऐकलेल्या, वाचलेल्या बाबींवर विचार न करता जशासतशा स्विकारतात. त्यामुळे प्रचार–प्रसार माध्यमसत्ता महत्वाची आहे.

मराठा समाजातील मुलांनी प्रचार–प्रसार माध्यमसत्ता हाती घेतली पाहीजे. समाजाच्या हिताचे, शेतकऱ्यांचे प्रश्न प्रचार–प्रसार माध्यमसत्तांवर मांडले पाहीजे.

* मराठा सेवा संघ प्रणित ३२ कक्ष *

१) संभाजी ब्रिगेड :-

हा युवकांचा कक्ष आहे. राजसत्ता हीच अनेक यशाच्या वाटेवर जाणारी व नेणारी सत्ता आहे. त्यासाठी मराठा सेवा संघास पोषक राजकीय मांडणी, आखणी करणारी ही संस्था आहे. राजकारणात भवितव्य असणाऱ्या तरुण–तरुणीसाठी आहे. हे या कक्षाचे कार्य आहे.

२) जिजाऊ ब्रिगेड :-

हा महिलांचा कक्ष आहे. मराठा महिलांना एकत्र करणे. अंधश्रध्दा, रुढी, परंपरा, विवाह, सामंजस्य क्षेत्रात प्रबोधन व कृतिशिलतेची जोड देने. हे या कक्षाचे कार्य आहे.

३) वीर भगतसिंह विद्यार्थी परीषद :-

हा विद्यार्थ्यांचा कक्ष आहे. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा व व्यवसाय मार्गदर्शन करणे. हे या कक्षाचे कार्य आहे.

४) डॉ.पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परीषद :-

हा शिक्षकांचा कक्ष आहे समाजामध्ये वैचारिक जागृती निर्माण व्हावे. हाडाचे शिक्षक तयार व्हावेत हे या कक्षाचे कार्य आहे.

५) पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी परीषद :-

हा शेतकऱ्यांसाठी कक्ष आहे. शेतकऱ्यांना आधूनिक तंत्रज्ञानाची माहिती देणे तसेच शेतकऱ्यांना सर्व प्रकारचे सहकार्य व मार्गदर्शन करणे. हे या कक्षाचे कार्य आहे.

६) शिवधर्मपीठ, सिंदखेडराजा-जिजाऊ सृष्टी :-

या कक्षाच्या माध्यमातून वैचारीक जागृती निर्माण करणे हा उद्देश आहे. धर्म म्हणजे व्रत,वैफल्य, पूजा,आरती, देव, देऊळ अशा भाकड अंधश्रध्दाळू कर्मकांडाच्या बाबी नसून मानवी जीवन अत्यंत सुखदायी, समृध्द, सुरक्षित, शांततामय व्हावे यासाठी प्रत्येकाने आपले आचार–विचार ठेवने वर्तमानात सत्य ठरणारे परिवर्तनवादी विचार आमलात आणणे. हे या कक्षाचे कार्य आहे.

७) जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परीषद :-

या कक्षाच्या माध्यमातून साहित्यीकांनी इतिहासाचे, धर्मशास्त्राचे, समाजशास्त्राचे लेखन करावे मराठा साहित्य संमेलनाचे आयोजन करावे. हे या कक्षाचे कार्य आहे.

८) संत नामदेव - तुकाराम वारकरी परीषद :-

या कक्षाच्या माध्यमातून समाजहितासाठी वारकरी बांधवांचा सहभाग घेणे.हे या कक्षाचे कार्य आहे.

९) संत गाडगेबाबा प्रबोधन कक्ष :-

या कक्षाच्या माध्यमातून समाजामध्ये वैचारिक जागृती निर्माण करणे, समाजामध्ये प्रबोधन करणे. हे या कक्षाचे कार्य आहे.

१०) मराठा उद्योजक कक्ष :-

या कक्षाच्या माध्यमातून मराठा समाजातील युवकांना उद्योगाकडे वळविने. हे या कक्षाचे कार्य आहे.

११) मराठा विज्ञान व तंत्रज्ञान कक्ष :-

या कक्षाच्या माध्यमातून नवनव्या विज्ञानवादी तंत्रज्ञानाचा वैयक्तिक व सामुहिक जिवनात यशस्वी वापर करने. हे या कक्षाचे कार्य आहे.

१२) मराठा वस्तीगृह कक्ष :-

या कक्षाच्या माध्यमातून गरीब,होतकरु, हुशार विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह बांधणे. महाराष्ट्रात जवळपास ३५० वस्तीगृह बांधणे. हे या कक्षाचे कार्य आहे.

१३) मराठा इतिहास कक्ष :-

या कक्षाच्या माध्यमातून इतिहासाचे संशोधक विद्यार्थी तयार करणे, संशोधन करणे, संशोधन करुन इतिहासातील सत्य,असत्य घटना पडताळून सत्य इतिहास जगा समोर आणने. संशोधन करणे, लिहीणे, प्रचार करणे. हे या कक्षाचे कार्य आहे.

१४) मराठा समन्वय कक्ष :-

या कक्षाच्या माध्यमातून मराठा समाजासोबत दूसऱ्या समाजाचा काही प्रश्न उभा राहिल्यास तो समन्वयाने आपआपसात सोडविणे. हे या कक्षाचे कार्य आहे.

१५) मराठा समेट कक्ष :-

या कक्षाच्या माध्यमातून मराठा समाजातील आपआपसातील सर्वच प्रकारचे मतभेद समेटव्दारे सोडविणे. हे या कक्षाचे कार्य आहे.

१६) मराठा गृह निर्माण कक्ष :-

या कक्षाच्या माध्यमातून मराठ्यांच्या गृह निर्माण संस्था उभ्या करणे. हे या कक्षाचे कार्य आहे.

१७) मराठा विद्यार्थी दत्तक योजना :-

या कक्षाच्या माध्यमातून गरीब, होतकरु, हुशार विद्यार्थ्यांना श्रीमंत व्यक्तींनी दत्तक घ्यावे. त्यांना आपल्या घरी ठेवावे, मदत करावी. हे या कक्षाचे कार्य आहे.

१८) मराठा व्यसनमुक्ती कक्ष :-

या कक्षाच्या माध्यमातून समाजाला सर्वच प्रकारच्या घातक दुर्व्यसनापासून दूर राहण्यास सांगणे. हे या कक्षाचे कार्य आहे.

१९) मराठा अर्थकोष कक्ष :-

या कक्षाच्या माध्यमातून प्रत्येक गावात मराठा बँक किंवा पतपेढी उभारुन मराठा तरुण–तरुणींना, शेतकरी, उद्योजक यांना आर्थिक सहकार्य करणे. हे कक्षाचे कार्य आहे.

२०) मराठा बालकल्याण कक्ष :-

या कक्षाच्या माध्यमातून बालकांवर सुसंस्कार करणे, बालसंस्कार मंत्राची निर्मिती करणे. हे या कक्षाचे कार्य आहे.

२१) मराठा न्यायदान कक्ष :-

या कक्षाच्या माध्यमातून मराठा समाजातील अहिताची वाटणारी प्रकरणे न्यायालयातून सोडविणे हे या कक्षाचे कार्य आहे.

२२) मराठा वधू-वर सूचक कक्ष व सामूहिक विवाह कक्ष :-

या कक्षाच्या माध्यमातून विवाह सबंधी समाजातील वाईट प्रथा बंद करणे. हुंडाबंदी, विधवा विवाह, सामुहिक नोंदणी विवाहास उत्तेजन देणे. हे या कक्षाचे कार्य आहे.

२३) मराठा आरोग्य व क्रिडा कक्ष :-

या कक्षाच्या माध्यमातून आरोग्याकडे लक्ष देवून तंदूरुस्तीसाठी वेगवेगळे क्रिडामध्ये सहभागी होणे. हे या कक्षाचे कार्य आहे.

२४) मराठा विचारवंत कक्ष :-

या कक्षाच्या माध्यमातून समाजात व जगात होत जाणाऱ्या बदलानूरुप समाजासाठी उपयूक्त ढोबळ धोरण तयार करणे. हे या कक्षाचे कार्य आहे.

२५) संगीतसुर्य केशवराव भोसले सांस्कृतिक परीषद :-

या कक्षाच्या माध्यमातून मराठ्यांच्या सर्वच संस्कृतीचे जतन करणे. हे या कक्षाचे कार्य आहे.

२६) विश्वशाहीर परीषद :-

या कक्षाच्या माध्यमातून लोककलेचा सन्मान करणे, विरांचा आदर करणे, शाहीरांना प्रोत्साहन देणे. हे या कक्षाचे कार्य आहे.

२७) सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकार परीषद :-

या कक्षाच्या माध्यमातून सहकार क्षेत्रात सहकार तत्वाची उभारणी करणे. हे या कक्षाचे कार्य आहे.

२८) राजर्षी शाहू शिक्षण परिषद :-

या कक्षाच्या माध्यमातून अत्यंत उत्तम प्रतीचे शिक्षण संस्था निर्माण करणे. हे या कक्षाचे कार्य आहे.

२९) तानूबाई बिरजे पत्रकार परीषद :-

या कक्षाच्या माध्यमातून वृत्तपत्र, दूरदर्शन, मालिका इत्यादी निर्माण करणे मराठामार्ग मासिक चालविणे, मराठामार्ग दैनिक सुरु करणे. हे या कक्षाचे कार्य आहे.

३०) छत्रपती शिवाजी मुस्लीम ब्रिगेड :-

या कक्षाच्या माध्यमातून मुस्लीम बांधवांना सामावून घेणे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यामध्ये अनेक मुस्लीम उच्चपदावर काम करीत होते. त्यामुळे त्यांना देखील सामावून घेणे. हे या कक्षाचे कार्य आहे.

३१) शिवराज्य :-

हा राजकिय पक्ष होता अलीकडच्या काळामध्ये संभाजी ब्रिगेडमध्ये विलीन करण्यात आला आहे.

३२) शिव वाईस :-

या कक्षाच्या माध्यमातून मराठा सेवा संघाच्या एकंदरीत कार्यावर अंकूश ठेवणे. हे या कक्षाचे कार्य आहे.

मराठा सेवा संघाच्या निर्मितीपासून महाराष्ट्रामध्ये जातीय सलोखा निर्माण झाला आहे. मराठा–मुस्लीम, मराठा–बौध्द वाद अलिकडच्या काळात पूर्णत: कमी झाला आहे. याचे श्रेय मराठा सेवा संघाला जाते त्यामुळे महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये मराठा सेवा संघाच्या योगदानाचा अभ्यास करण्यासाठी हा विषय निवडला आहे.

* संशोधनाची उद्दिष्ट्ये *

संशोधनासाठी खालील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आलेली आहेत. कोणत्याही संशोधनाचा विषय निश्चित करीत असतांना त्या विषयाच्या अनुषंगाने उद्दिष्टे निश्चित करणे आवश्यक असतात. ती खालील प्रमाणे आहेत.

१) मराठा सेवा संघाच्या स्थापनेचा आढावा घेणे.
२) मराठा सेवा संघाने राजकीय, सामाजिक,धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रात केलेल्या कार्यावर प्रकाश टाकणे.
३) मराठा सेवा संघाने ३२ कक्षाच्या माध्यमातून केलेल्या कार्यावर प्रकाश टाकणे.
४) समाजामध्ये जातीय व धार्मिक सलोखा निर्माण करणे.
५) तरुण–तरुणीमध्ये जबाबदार नागरिकांची भावना निर्माण करणे.
६) मराठा सेवा संघाच्या माध्यमातून स्त्रियांबद्दल आदर व सन्मान निर्माण करुन स्त्री–पुरुष समानतेचा विचार रुजविणे.

* संशोधनाची गृहितके *

संशोधनासाठी एखादा विषय निश्चित केल्यावर त्या विषयाच्या संदर्भात काही गृहितके किंवा संभाव्य उत्तरे मांडावी लागतात. या संभाव्य उत्तरे किंवा अनूमानामुळे संशोधक आपले लक्ष काही निश्चत व आवश्यक तथ्यावरच केंद्रीत करतो. त्यामुळे संशोधनाला एक निश्चित दिशा मिळते. या संभाव्य उत्तरांनाच गृहितके म्हणतात. गुड व हॅट यांच्या मते, ''गृहितके म्हणजे असे विधान आहे की, ज्यांची समप्रमाणता ठरविण्यासाठी परीक्षण केले जाते. आणि ते पूढील संशोधनासाठी उपयुक्त असते''. सबंधीत विषयाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने गृहितके निश्चित करण्यात आली आहेत. ते पूढील प्रमाणे.

१) मराठा सेवा संघाचे राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतीक क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान आहे.

२) मराठा सेवा संघाने ३२ कक्षाच्या माध्यमातून केलेले कार्य विशेष उल्लेखनीय आहे.

३) मराठा सेवा संघामूळे समाजामध्ये जातीय व धार्मिक सलोखा निर्माण झाला आहे.

४) मराठा सेवा संघामूळे तरुण-तरुणीमध्ये जबाबदार नागरिकांची भावना निर्माण झाली आहे.

५) मराठा सेवा संघामूळे समाजामध्ये स्त्रियांबद्दल आदर व सन्मान निर्माण झाला आहे.

६) मराठा सेवा संघामूळे मराठा तरुण-तरुणी व्यवसायाकडे वळत आहेत.

७) मराठा सेवा संघामूळे अनेक इतिहास संशोधक, लेखक, साहित्यीक तयार झाले आहेत.

८) मराठा सेवा संघामूळे अनेक वक्ते तयार झाले आहेत. त्यामध्ये काही खासदार, आमदार आहेत.

* विषयाची निवड व त्याचे महत्व *

महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये मराठा सेवा संघाचे योगदान अत्यंत महत्वपूर्ण आहे. संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून तरुणांना त्यांची शक्ती विधायक कामासाठी किंवा समाजाच्या हितासाठी लावली. जिजाऊ ब्रिगेडच्या माध्यमातून स्त्रीयांना अंधश्रध्दा, रुढी, पंरपरेतून बाहेर काढले. स्त्री-पुरुष समानतेचा विचार रुजवला. डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परीषदेच्या माध्यमातून हाडाचे शिक्षक निर्माण केले. वीर भगतसिंह विद्यार्थी परीषदेतून विद्यार्थ्यांना जबाबदार नागरीक घडविले. डॉ.विठ्ठलराव विखे पाटील कृषी परीषदेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधूनिक तंत्रज्ञान अवगत करून दिले. मराठा सेवा संघाने अनेक वक्ते घडविले त्यातून अनेक जन खासदार, आमदार झाले.

मराठा सेवा संघामुळे महाराष्ट्रात राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतीक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बद्दल घडवून आले. त्यामुळे या विषयाचे महत्व आहे. हा विषय सर्व समाजातील व्यक्तींसाठी प्रेरणादायी आहे. त्यामळे हा विषय निवडला आहे.

* संशोधन पध्दती *

प्रस्तूत संशोधन विषयाचा अभ्यास करीत असतांना अनेक संशोधन पध्दतीचा अवलंब

करण्यात येणार आहे. सर्वेक्षणात्मक, तुलनात्मक, मूलाखत या संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे. प्रस्तूत संशोधन कार्य करत असतांना प्राथमिक व दूय्यम साधनांचा काळजीपूर्वक व शास्त्रशूध्द पध्दतीने उपयोग करणार आहे व त्यांच्या विचारसणीचा आणि कार्याचा शोध घेणार आहे. प्राथमिक साधनामध्ये अप्रकाशित व मूळ साधनांचा वापर करण्यात येणार आहे. तसेच दूय्यम स्वरुपाची साधने त्यामध्ये दैनिक, साप्ताहिक, मासिक, विशेषांक, गौरवांक व इंटरनेट यांचाही आधार घेवून संशोधन पुर्ण करण्यात येणार आहे.

⁕ प्रकरणाचे वर्गीकरण ⁕

शोधप्रबंधाची मांडणी एकूण ७ प्रकरणात केली आहे. यांचा संक्षिप्त आराखडा पुढीलप्रमाणे आहे.

१) प्रकरण पहिले :- महाराष्ट्राची पार्श्वभूमी

प्रस्तूत प्रकरणात महाराष्ट्राच्या भौगौलिक, स्थितीवर प्रकाश टाकून महाराष्ट्राचे भौगौलिक वैशिष्ट्ये व रचना स्पष्ट करण्यात येणार आहे. त्याप्रमाणे ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

२) प्रकरण दूसरे :- पुरुषोत्तम खेडेकर यांचे जीवन व कार्य

प्रस्तूत प्रकरणात पुरुषोत्तम खेडेकर यांचे बालपन, प्राथमिक, माध्यमिक उच्चमाध्यमिक शिक्षण व त्यांच्या कार्यारंभाची सविस्तर माहिती या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

३) प्रकरण तिसरे :- मराठा सेवा संघाची स्थापना, ३२ कक्ष व प्रसार

प्रस्तूत प्रकरणात मराठा सेवा संघाची स्थापना आणि प्रसार या कार्याचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे.

४) प्रकरण चौथे :- मराठा सेवा संघाची राजकिय, सामाजिक क्षेत्रातील कामगिरी

प्रस्तूत प्रकरणात मराठा सेवा संघाची राजकिय, सामाजिक क्षेत्रातील कामगिरीचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे.

५) प्रकरण पाचवे :- मराठा सेवा संघाची धार्मिक, सांस्कृतीक क्षेत्रातील कामगिरी

प्रस्तूत प्रकरणात मराठा सेवा संघाची धार्मिक, सांस्कृतीक क्षेत्रातील कामगिरीचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे.

६) प्रकरण सहावे :- मराठा सेवा संघाचे निवडक कार्यकर्ते

प्रस्तूत प्रकरणात मराठा सेवा संघाच्या कार्यकर्त्यांनी समाजासाठी समाजोपयोगी कामे केली, प्रबोधन केले अश्या काही महत्वाच्या कार्यकर्त्यांच्या कामगिरीचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे.

७) प्रकरण सातवे :- निष्कर्ष

*** संदर्भ ग्रंथ सूची ***

०१) र.भ. भुसारी, "महाराष्ट्रातील प्राचीन जनपदे" मराठवाडा इतिहास संशोधन मंडळ, पूणे, १९७४

०२) डॉ.एस.एस. गाठाळ, "आधूनिक महाराष्ट्राचा इतिहास" २००५

०३) कि.का. चौधरी (संपादक), "महाराष्ट्र राज्य गॅझेटियर" कार्यकारी संपादक व सचिव दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, मराठी आवृत्ती (सुधारित) १९८८

०४) जे.सी. आग्रवाल, "भारत में नारी शिक्षा" विद्या विहार प्रकाशन, नई दिल्ली, १९९८

०५) बाबुराव सातपुते, "संतांचा महिमा" ज्ञानेश्वरी प्रकाशन, डोंबीवली पुर्व, २०१३

०६) हि.रा. आहेर, "उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण" श्रीविद्या प्रकाशन, नागपूर, २००२

०७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, "शुद्र पूर्वी कोन होते?" क्षितीज प्रकाशन, नागपूर, २००९

०८) भा.ल.भोळे, "भारताच्या स्वातंत्र्यास ५० वर्षाचा मागोवा" साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९८

०९) रा.शि. दिनकर, "भारतकी जनजातीयाँ" किताब घर, दिल्ली, २०००

१०) प्रा. बि.एस. धांडे, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर व बहूजन नेतृत्व" कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, २००५

११) पुरुषोत्तम खेडेकर, "बाल शिक्षण" जिजाई प्रकाशन, पूणे, १२ जानेवारी २०११

१२) पुरुषोत्तम खेडेकर, "फुले-शाहू-आंबेडकर" जिजाई प्रकाशन, पूणे, १९-२० ऑक्टोबर २०१३

१३) पुरुषोत्तम खेडेकर, "रेखांकन" जिजाई प्रकाशन, पूणे, १७ जुन २००९

१४) पुरुषोत्तम खेडेकर "कुणबी मराठा समाजाच्या यशाची पंचसुत्री" जिजाई प्रकाशन, पूणे, १२ जानेवारी २०००

१५) शिवधर्म प्रकाशन "शिवधर्म गाथा" १२ जानेवारी २०१३

१६) पाठक श.अ. "मराठवाडा : एक सांस्कृतीक मागोवा" विद्या बुक पब्लीशर्स, औरंगाबाद, २०१९

१७) डॉ. रामराव गोळे "मराठा सेवा संघ इतिहास" जिजाऊ सृष्टी सिंधखेड राजा, २०१८

१८) प्रा. विनायक बंगार, "बुडता है जन" लोकायत प्रकाशन, सातारा, १० ऑगस्ट २००३

१९) अशोक राणा, "स्वराज्य संकल्पिका राष्ट्रमाता जिजाऊ" जिजाई प्रकाशन, पूणे, १२ जानेवारी २००१

२०) प्रा. डॉ. रामभाऊ मुटकुळे "महात्मा फुले कृत मराठ्यांचा इतिहास" पंचफुला प्रकाशन, औरंगाबाद,१२ जानेवारी २०१४

२१) प्रा.डॉ. एस.ए. बाहेकर, "राजमाता-राष्ट्रमाता जिजाऊ" कसब प्रकाशन, जळगाव, ६ डिसेंबर २००७

२२) डॉ. आ.ह. साळुंके, "छत्रपती शिवाजी महाराजांचा दुसरा राज्यभिषेक" लोकायत प्रकाशन, सातारा, जुन २०१५

२३) अशोक राणा, "वर्ण वर्चस्वाच्या विरोधात शिवरायांचा संघर्ष" जिजाई प्रकाशन, पूणे, ३० ऑगस्ट २००९

२४) विर उत्तमराव मोहीते, "मराठ्यांच्या सांस्कृतीक क्रांतीचा इतिहास" जिजाई प्रकाशन, पूणे, २७ डिसेंबर १९८८

२५) चंद्रशेखर शिखरे, “प्रतिइतिहास” जिजाई प्रकाशन, पूणे, २४ सप्टेंबर २००५
२६) पुरुषोत्तम खेडेकर, “लोकराजे शिवराय” जिजाई प्रकाशन, पूणे, १३ नोव्हेंबर २०१०
२७) शहाजी देसाई, “युगपुरुष” जिजाई प्रकाशन, पूणे, २०२१
२८) प्रा. मा.म. देशमुख, “मराठा कुणबी समाजाची दशा आणि दिशा” शिवभारती प्रकाशन, नागपूर, १९९३
२९) जिजाऊ सृष्टीतील कागदपत्रे
३०) “दैनिके”
३१) “मासिके”
३२) “साप्ताहिके”
३३) “विशेषांक”
३४) “गौरवांक”
३५) “ई–बुक्स”
३६) “इंटरनेट वरील माहिती”

✲ संशोधक ✲	✲ संचालक ✲	✲ मार्गदर्शक ✲
शिवाजी भगवानराव ताटे	**डॉ.एन.जी.भद्रे**	**डॉ.डी.डी.कोल्हेकर**